# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date – 13 June 2025

## Time 18.10 to 18.20

## Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक – १५ जून २०२५ सायंकाळी ६.१०**

****

- अहमदाबाद विमान दुर्घटनेच्या मलब्यातून डिजिटल व्हिडीओ रेकॉर्डर प्राप्त-ब्लॅक बॉक्सचा शोध सुरू
- पंतप्रधानांकडून अपघातातल्या जखमींची विचारपूस-ओळख पटलेले मृतदेह कुटुंबीयांकडे सुपूर्द
- छत्रपती संभाजीनगरच्या पाणी पुरवठ्यासंदर्भात सर्व कामं विहित कालावधीत पूर्ण करण्याचे विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांचे निर्देश

आणि

- जालना मुंबई वंदे भारत रेल्वेचा नांदेडपर्यंत विस्तार करण्यास रेल्वे मंत्रालयाची मान्यता

****

अहमदाबाद विमान दुर्घटनेच्या मलब्यातून गुजरात दहशतवाद विरोधी पथकाला विमानाचा डिजिटल व्हिडीओ रेकॉर्डर सापडला आहे. मात्र विमानाचा ब्लॅक बॉक्स सापडल्याच्या वृत्ताला अद्याप दुजोरा मिळालेला नाही. या अपघाताच्या चौकशीसाठी न्यायवैद्यकीय तज्ज्ञांचं पथकही लवकरच घटनास्थळी दाखल होणार आहे. अमेरिकेच्या राष्ट्रीय वाहतूक सुरक्षा मंडळाचं तपास पथकही या अपघाताच्या चौकशीसाठी भारतात दाखल होणार आहे, या तपासात भारतीय अधिकाऱ्यांना हे पथक मदत करणार असल्याचं सुरक्षा मंडळानं समाज माध्यमांवरच्या संदेशात म्हटलं आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज सकाळी अहमदाबाद इथं घटनास्थळाला प्रत्यक्ष भेट देऊन पाहणी केली. तसंच या अपघातात जखमी झालेल्यांची सरकारी रुग्णालयात जाऊन भेट घेतली. अपघातातून आश्चर्यकारकरित्या बचावलेले प्रवासी रमेश विश्वासकुमार यांच्याशी पंतप्रधानांनी संवाद साधला. रमेश यांनी आपला अनुभव या शब्दांत कथन केला.

**बाईट – रमेश विश्वासकुमार**

पंतप्रधानांनी परिस्थितीचा आणि बचाव कार्याचा एका बैठकीत आढावा घेतला. सर्व शोकाकुल कुटुंबांच्या दुःखात आपण सहभागी आहोत, अशी प्रतिक्रिया पंतप्रधानांनी व्यक्त केली. या दुर्घटनेत मृत्युमुखी पडलेले गुजरातचे माजी मुख्यमंत्री विजय रुपाणी यांच्या कुटुंबाची पंतप्रधानांनी भेट घेऊन, त्यांचं सांत्वन केलं.

दरम्यान, या दुर्घटनास्थळाच्या परिसरातल्या अनेक रहिवाशांचा शोध अद्याप सुरू आहे. दुर्घटनेत मृत्युमुखी पडलेल्यांच्या मृतदेहांची डीएनएच्या मदतीने ओळख पटवण्याचं काम सुरू असून, ओळख पटलेले मृतदेह शवविच्छेदनानंतर कुटुंबांकडे सुपूर्द केले जात आहेत. आतापर्यंत सहा मृतदेह संबंधित कुटुंबांकडे सुपूर्द करण्यात आले आहेत.

अहमदाबादच्या सरकारी रुग्णालयात सध्या ३२ जणांवर उपचार सुरू असून गंभीररीत्या होरपळलेले काही रुग्ण वगळता अन्य सर्वांची प्रकृती स्थिर असल्याची माहिती रुग्णालयाचे अधीक्षक डॉ. राकेश जोशी यांनी दिली, ते म्हणाले –

**बाईट – डॉ.राकेश जोशी**

अहमदाबाद विमान अपघातात मृत्युमुखी पडलेल्यांमध्ये महाराष्ट्रातल्या सात जणांचा समावेश आहे. यातले पाच जण एअर इंडियाचे कर्मचारी होते. वैमानिक कॅप्टन सुमित सभरवाल हे पवईचे तर त्यांचे सहकारी दीपक पाठक हे बदलापूरचे रहिवासी होते. डोंबिवली इथल्या रोशनी सोनघरे, पनवेलच्या मैथिली पाटील आणि गोरेगावच्या इथल्या अपर्णा महाडिक या कर्मचाऱ्यांसह सांगली जिल्ह्यातले महादेव पवार आणि त्यांच्या पत्नी आशा पवार या प्रवाशांचाही या अपघातात मृत्यू झाला.

****

इस्रायल आणि इराणमधील सुरू असलेल्या लष्करी संघर्षाच्या पार्श्वभूमीवर आज सकाळी मुंबईहून लंडनला जाणाऱ्या एअर इंडियाचं विमान अर्ध्यातूनच परत आलं. तर काही विमानं इतर ठिकाणी वळवण्यात आली आहेत. या विमानांची यादी एअर इंडियाने जाहीर केली आहे.

****

थायलंडमधील फुकेतहून दिल्लीला जाणाऱ्या एअर इंडियाचं विमान आज उड्डाणानंतर लगेचच उतरवण्यात आलं. एका प्रवाशानं बॉम्बची धमकी मिळाल्याची सूचना दिल्यानं हे विमान उतरवण्यात आल्याचं अधिकाऱ्यांनी सांगितलं. विमानातील १५६ प्रवासी सुखरूप असून तपासात कोणतीही स्फोटकं सापडली नसल्याचं, याबाबतच्या वृत्तात म्हटलं आहे.

****

मातंग समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी बार्टीच्या धर्तीवर ‘आर्टी’ संस्थेचे सक्षमीकरण करण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले. मातंग समाजाच्या मागण्यासंदर्भात झालेल्या बैठकीत ते बोलत होते. यासाठी अनुसूचित जातींच्या आरक्षणात उपवर्गीकरणासाठी निवृत्त न्यायमूर्ती अनंत बदर यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली असल्याचं त्यांनी सांगितलं. आगामी जातनिहाय जनगणनेमध्ये लोकसंख्येच्या आधारे वर्गीकरणात आवश्यकतेनुसार बदल करण्यात येईल, असंही मुख्यमंत्र्यांनी यावेळी सांगितलं.

****

शीख धर्मियांचे नववे गुरु तेगबहादूरसिंग यांचा ३५० वा हौतात्म्य दिन आणि दहावे गुरु गोविंदसिंग यांच्या ३५०व्या गुरु-ता-गद्दी कार्यक्रमाचं आयोजन राज्यात नांदेड, नागपूर आणि मुंबई या ठिकाणी करण्यात येणार आहे. यासाठी शासन संपूर्ण सहकार्य करेल, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली आहे. या कार्यक्रमाबाबत आज मुंबईत राज्यस्तरीय समितीची बैठक झाली, त्यावेळी ते बोलत होते. हा कार्यक्रम नांदेड इथं १५ आणि १६ नोव्हेंबरला, नागपूर इथं ६ डिसेंबरला, तर नवी मुंबईत २१ आणि २२ डिसेंबरला आयोजित करण्यात येणार आहे.

****

छत्रपती संभाजीनगरच्या पाणी पुरवठ्यासंदर्भात सर्व कामं विहित कालावधीत पूर्ण करण्याचे निर्देश विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांनी दिले आहेत. पापळकर यांनी आज या कामाची पाहणी केली, त्यावेळी ते बोलत होते. या पाणीपुरवठा योजनेच्या सर्व तांत्रिक पूर्तता करून ती ऑक्टोबर अखेरीस कार्यान्वित करण्यात येणार आहे.

****

अहिल्यानगर जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी कार्यालयाच्या पथकानं आज राहुरी तालुक्यात एका गोदामावर छापा टाकून अनधिकृत खत साठा जप्त केला. या कारवाईत पन्नास किलोच्या गोण्या, दहा किलोच्या बादल्या आणि एक लिटरच्या खताच्या बाटल्या असा जवळपास साडे सात लाख रुपये किमतीचा मुद्देमाल पथकानं जप्त केला आहे. जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सुधाकर बोराळे यांनी ही माहिती दिली.

****

राज्यस्तरीय खरीप हंगाम २०२४–२५ पीक स्पर्धेत पहिले चार क्रमांक सातारा जिल्ह्यातल्या शेतकऱ्यांनी मिळवले आहेत. सातारा जिल्हा कृषी अधीक्षकांनी पत्रकाद्वारे ही माहिती दिली. विविध ११ पिकांसाठी ही स्पर्धा राज्यस्तरावर घेण्यात आली होती.

****

जालना मुंबई वंदे भारत रेल्वेचा नांदेडपर्यंत विस्तार करण्यास रेल्वे मंत्रालयाने मान्यता दिली आहे. त्यानुसार ही गाडी आता नांदेडहून दररोज पहाटे पाच वाजता सुटेल. परभणीहून पाच वाजून चाळीस मिनिटांनी, जालना सात वीस, तर छत्रपती संभाजीनगरहून सकाळी सव्वा आठ वाजता सुटेल. परतीच्या प्रवासात मुंबईहून दुपारी एक वाजून दहा मिनिटांनी निघून सायंकाळी सात वाजून पाच मिनिटांनी छत्रपती संभाजीनगर, आठ वाजून सात मिनिटांनी जालना, पावणे दहा वाजता परभणी तर रात्री दहा वाजून पन्नास मिनिटांनी नांदेडला पोहोचणार आहे.

****

जागतिक योग दिन येत्या २१ जून रोजी साजरा करण्यात येणार आहे. या पार्श्वभूमीवर आकाशवाणी दररोज आपल्या श्रोत्यांसाठी एका आसनाविषयी माहिती देत आहे. आज आपण योगशिक्षक डॉ प्रशांत देशमुख यांनी दिलेली भुजंगासनाविषयीची माहिती जाणून घेऊ या –

**बाईट – डॉ.प्रशांत देशमुख, योगशिक्षक**

****

परभणी जिल्ह्यात पूर्णा इथं आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या पार्श्वभूमीवर आज योग शिबिर घेण्यात आलं. शहरातील विद्या प्रसारणी शाळेच्या सभागृहात समर्थ प्रभात योग समिती आणि आर्ट ऑफ लिव्हिंग यांच्या संयुक्त विद्यमाने हे शिबिर घेण्यात आलं. यावेळी योग प्रशिक्षकांनी विविध आसनांची प्रात्यक्षिकं सादर केली त्यानंतर योग जनजागरण फेरी काढण्यात आली.

****

हवामान

येत्या चोवीस तासांत मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात काही ठिकाणी जोरदार वारे आणि विजांच्या कडकडाटासह मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे.

आज दुपारी जालना तसंच छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातल्या बहुतांश भागात पाऊस झाला. जालना जिल्ह्यात सलग तीन दिवसांपासून पडत असलेल्या पावसामुळे शेतकऱ्यांनी कपाशी लागवडीसह पेरणीच्या कामांना सुरुवात केली आहे.

विभागात पुढचे पाच दिवस हलका ते मध्यम स्वरुपाच्या पावसाचा इशारा परभणीच्या वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठातल्या हवामान केंद्राने दिला आहे.

हवामान विभागानं आज रत्नागिरी आणि सिंधुदुर्गसाठी रेड अलर्ट तर मुंबई आणि पालघर वगळता कोकण तसंच पश्चिम महाराष्ट्रातल्या इतर जिल्ह्यांना ऑरेंज अलर्ट दिला आहे. उर्वरित महाराष्ट्रातही येत्या दोन दिवसात जोरदार पावसाची शक्यता आहे.

****